पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी-२६
जा.क्र.कक्षेका/कावि/ ७२६ /२०१४
दि. २६ /२ /२०१४

प्रति,
मा.----------------------------
सदस्य/सदस्या
क प्रभाग समिती

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ५ / ३ /२०१४ रोजी दु. ३.०० वाजता आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ५/३/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत- १. सर्व संबंधित शाखाप्रमुख
२. कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक-१४

दिनांक- ५ / ३ /२०१४ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ५/३/२०१४ रोजी दुपारी ३.०० वाजता क प्रभाग कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ४/१२ /२०१३ व दि. १८/१२/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.९) सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक ८/१/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१०) सभावृत्तातंत कायम करणे.
क) दिनांक १८/१/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्र.१२) सभावृत्तांत कायम करणे.
ड) दि.६/०२/२०१४ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्र.१३) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक १) क प्रभाग कार्यक्षेत्रातील EPABX यंत्रणेची देखभाल दुरुस्ती करणे या कामास व र.रु. ५,८०,०००/- चे सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.राहुल भोसले व मा.चंद्रकांत वाळके यांचे पत्र- नेहरुनगर मधील मुख्य चौकात पं.जवाहरलाल नेहरु यांचा पुतळा असुन, पुतळयासमोरील मुख्य चौकाला पं.जवाहरलाल नेहरु चौक असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) मा.किरण मोटे व मा.जितेंद्र ननावरे यांचे पत्र- मुंबई पुणे महामार्गावरील कासारवाडी नाशिक फाटा येथे झालेल्या दुमजली उड्डाणपुलास “ जे.आर.डी. टाटा उड्डाणपुल ” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

क्र.कप्रस/कावि/७२६ /२०१४
दि. २६ / २ /२०१४